फौजदारी प्रक्रिया संहितेच्या (१९७४ चा अधिनियम दोन)प्रकरण एकवीस अन्वये संक्षिप्त केलेल्या खटला क्रं.१११/२०२३ चा अभिलेख

**निशाणी क्रं. –    /सी**

**श्री.एन.के.नागरगोजे, न्यायदंडााधिकारी प्रथमवर्ग, कळे–खेरीवडे यांचे न्यायालयात.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अपराध घडल्याचा दिनांक | – | १९–०२–२०२३ |
| २. | अहवाल किंवा फिर्यादीचा दिनांक | – | १९–०२–२०२३ |
| ३. | फिर्याददराचे नांव, त्यांच्या आई व बापाचे नांव, त्यांचे वय व त्यांचे निवासस्थान इ. | – | सहा.पोलीस निरीक्षक, कळे पोलीस ठाणे, ता. कळे, जि.कोल्हापूर. |
| ४. | आरोपीचे नांव, त्यांच्या आई व बापाचे नांव, त्यांचे वय व त्यांचे निवासस्थान इ. | | विजयकुमार परशुराम पोवार, व.व.३७, रा. माजनाळ, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर. |
| ५–अ | ज्याच्याबद्दल फिर्याद दिली आणि जो अपराध आरोपीला समजावून सांगण्यात आला त्या अपराधाचा तपशील – | | |

तुम्ही वर नमूद आरोपी विजयकुमार परशुराम पोवार यांनी दिनांक १८–०२–२०२३ रोजी सांयकाळी ४.०० वाजताचे सुमारास पाटील ॲटो इलक्ट्रीकल दुकाना जवळ, मरळी ते कळे रोडवर तुमच्या ताब्यातील मोटर सायकल क्रं. एम.एच्–४३ टी–०३१३ ही मानवी जिवित धोक्यात येईल अथवा कोणत्याही व्यक्तीला दुखापत अगर क्षती पोहचेल इतक्या बेदरकारपणे, हयगयीने चालवून स्प्लेंडर मोटरसायकल क्रं. एम.एच–०९–बीआर–३२०१

ला धडक देवून फिर्यादी प्रदिप पांडूरंग पाटील यांना जखमी होण्यास कारणीभूत झालात म्हणून त्याप्रमाणे तुम्ही माझ्या अखत्यारीत भारतीय दंड विधान **कलम २७९** प्रमाणे शिक्षापात्र गुन्हा केला आहे. सदरचा गुन्हा या न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात येतो.

दुसरे असे की, तसेच तुम्ही वर नमुद वेळी व ठिकाणी तुमचे ताब्यातील वर नमूद मोटर सायकल क्रं. एम.एच्–४३ टी–०३१३ ही मानवी जिवीत धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे व हयगयीने चालवून स्प्लेंडर मोटरसायकल क्रं. एम.एच–०९–बीआर–३२०१ यास जोराची धडक देवून फिर्यादी प्रदिप पांडूरंग पाटील यास गंभीर दुखापत पोहचवीलीत म्हणून तुम्ही माझे अखत्यारीत भारतीय दंड विधान **कलम ३३८** प्रमाणे शिक्षापात्र गुन्हा केला आहे. सदरचा गुन्हा या न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात येतो.

चौथे असे की, तसेच तुम्ही वर नमुद वेळी व ठिकाणी तुमचे ताब्यातील वर नमूद मोटर सायकल क्रं. एम.एच्–४३ टी–०३१३ ही भरधाव वेगाने, बेदरकारपणे व निष्काळजीपूर्वक रस्त्याचे परिस्थितीकडे व रहदारीकडे दुर्लक्ष करुन व अपघात केला व त्याप्रमाणे तुम्ही माझे अखत्यारीत मोटार वाहन कायदा **कलम १८४** प्रमाणे शिक्षापात्र गुन्हा केला आहे. सदरचा गुन्हा या न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात येतो.

शेवटी असे की, तुम्ही वर नमुद वेळी व ठिकाणी तुमचे नावे असलेला वर नमूद मोटर सायकल क्रं. एम.एच्–४३ टी–०३१३ याचे विमापत्र

अंमलात असल्याशिवाय सार्वजनिक ठिकाणी सदर वाहनाचा उपयोग केला करण्याची परवानगी दिली व त्याद्वारे तुम्ही मोटार वाहन कायदा **कलम १४६ सह कलम १९६** प्रमाणे अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला आहे. सदरचा गुन्हा या न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात येतो.

यावरुन मी असा आदेश देतो की, उपरोक्त कलमाअंतर्गत तुमच्याविरुध्द खटला चालविण्यात यावा.

**ब.)** **<u>कलम व अधिनियम</u>** – भा.द.वि.स.क २७९, ३३८ व मोटर वाहन कायदा कलम १८४,१४६–१९६ प्रमाणे.

**<u>आरोपीचे प्रतिकथन</u>** –

प्रश्न १– तुम्हाला पोलीस पेपर्सच्या नकला मिळाल्या काय?

उत्तर–

प्रश्न २– तुम्हाला आता तुमच्यावर ठेवण्यात आलेला आरोप वाचून समजावून सांगण्यात आला तो तुम्हाला समजला ?

उत्तर–

प्रश्न ३– तुम्हाला गुन्हा कबूल आहे का?

उत्तर–

समक्ष ................................

(आरोपीची सही/अंगठा)

(व्ही.ए.लावंड–कोकाटे)

न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कळे–खेरीवडे.

आरोपीने माझे समक्ष आरोपांचा तपशील त्याच्या भाषेत सुनावण्यात आला. तो त्यास कबूल नसून आरोपी केस पुढे चालविण्यास तयार आहे.

दि.१९.१२.२०२३.
कळे–खेरीवडे.

(व्ही.ए.लावंड–कोकाटे)
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,
कळे–खेरीवडे.